"मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा" 

तालुका प्रथम क्रमांक प्राप्त शाळा

सत्यमेव जयते

॥ विद्या विनयेन शोभते ॥

# जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा, सलगर

ता.अक्कलकोट जि.सोलापूर - 413216 (महाराष्ट्र)

स्थापना : 1948 UDISE Code : 27300111401

दत्तात्रय पोतदार, मुख्याध्यापक - मो.नं. 9890311596 Email - dattatryapotdar68@gmail.com

**जा.क्र.** 12/2026 **दिनांक :** 30/04/2026

**प्रति,**
**बिरेवार फाऊंडेशन ट्रस्ट,**
**मुंबई.**

**विषय :- आमच्या शाळेस मदत मिळणेबाबत...**

उपरोक्त विषयांस अनुसरुन कारणे विनंती की, आमच्या जि.प. प्राथमिक सलगर मराठी, कन्नड व उर्दू या तिन्ही माध्यमाच्या शाळा एकच कॅम्पस मध्ये भरतात. एकूण 410 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यातील बहुतांश विद्यार्थी हे गोरगरीब शेतकरी व शेतमजूरांची मुले आहेत. या मुलांना उत्तम व आधुनिक पध्दतीने शिक्षण देण्यासाठी शाळेतील 17 शिक्षक बांधव सदैव प्रयत्नशील व कटिबध्द आहोत.

गतवर्षी आमची शाळा ही महाराष्ट्र शासनाच्या "मुख्यमंत्री स्वच्छ शाळा, सुंदर शाळा" या स्पर्धात्मक उपक्रमामध्ये तालुका स्तरावर प्रथम क्रमांक प्राप्त केलेला आहे. तसेच प्रधानमंत्री पोषण आहार योजनेतंर्गत परसबाग स्पर्धेत ही तालुकास्तरावर पहिला व जिल्हास्तरावर तृतीय क्रमांक प्राप्त केलेला आहे. शाळेतील आमचे अनेक विद्यार्थी हे शालेय व सहशालेय उपक्रमामध्ये केंद्र व तालुका स्तरावर अनेक पारितोषिक प्राप्त केलेली आहेत. याचेच फलित म्हणून मला स्वत:ला तालुका आदर्श शिक्षक पुरस्कार व जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार तसेच रोटरी क्लब राष्ट्रबांधणी पुरस्कार मिळालेले आहे.

तरी खालील बाबीसाठी आमच्या शाळेस आपल्या कंपनीकडून सी.एस.आर. योजनेमधून मदत मिळावी.

1. **लाल माती टाकून क्रीडांगण तयार करुन इ. 1 ली ते 4 थी विद्यार्थ्यांसाठी खेळाचे साहित्य बसविणे. (लॅडर्स ॲन्ड स्लाइडर्स्, स्विंग टु सिटर, सी-सॉ, टु सिटर, मेरी गो राऊंड, मंकी बार, बेंच थ्री सिटर) (अंदाजित खर्च रु. 5.00/- लक्ष रुपये)**
2. **(अ) इ. 1 ली ते 4 थी विद्यार्थ्यांसाठी प्रत्येकी 200 पानी 6 वह्या याप्रमाणे 1500 लहान साईजच्या वह्या (रेग्युलर)**

   **(ब) इ. 5 वी ते 7 वी विद्यार्थ्यांसाठी प्रत्येकी 200 पानी 8 वह्या याप्रमाणे 1500 मोठ्या साईजच्या वह्या (क्वायर) (अंदाजित खर्च रु. 1.50/- लक्ष रुपये)**

   **(असे एकूण खर्च रु. 6.50/- लक्ष रुपये)**

वरील बाबींचा सहानुभूतीपूर्वक विचार होवून आमच्या शाळेतील गोरगरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आपल्या कंपनीच्या सी.एस.आर. योजनेमधून मदत करावी ही सविनय विनंती.

उपरोक्त विषयातील संदर्भान्वये आमच्या शाळेतील कामासाठी आपल्या ट्रस्टकडे रु.6.50 लाख ची मागणी केलेली होती.

तथापि आपला ट्रस्टकडून किमान रु. 25000/- (पंचवीस हजार) मिळावेत, ही विनंती.

**आपला विश्वासू,**

**दत्तात्रय पोतदार**
**मुख्याध्यापक**